# <u>राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना</u>

| अ.क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नांव | **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना** |
| 2 | योजने बद्दलचा शासन निर्णय | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक 7.10.2017, 31.03.2018, 07.08.2018 व दिनांक 11.7.2019. |
| 3 | योजनेचा स्वरूप | सदर योजनेंतर्गत उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान - विना अनुदान) / कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठा अंतर्गत असलेल्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यीत खाजगी विद्यापीठे वगळून) व्यावसायीक व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. 8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्तीचा लाभ देय आहे. |
| 4 | योजनेचा उद्देश | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सहाय्य करणे. |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सदर योजना बिगर आरक्षित प्रवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थांना लागू राहील. |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | १. अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. तथापि महाराष्ट्र - कर्नाटक राज्य सीमा भागातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकतात.<br>२. अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 8 लाख किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.<br>३. शासन निर्णयानुसार प्रथम दोन मुले या योजनेसाठी पात्र आहेत.<br>४. शासन निर्णय दिनांक 07/10/17 (डीएचई अभ्यासक्रम) मधील अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज करू शकतात.<br>५. अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>६. या योजनेचा लाभ दूरस्थ पध्दतीने (Open /Distance /Virtual Learning) अथवा अर्धवेळ (Part-Time) स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.<br>७. तसेच योजेनच्या लाभाकरीता अनुज्ञेय असलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची व संबंधित सक्षम संस्थाची (AICTE/PCI/COA/MCI/NCTE, विद्यापीठ / शिक्षण मंडळ, इ.) पूर्व मान्यता व संलग्नता असणे आवश्यक आहे.<br>८. अर्जदार विद्यार्थ्यास प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल.<br>९. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | १. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>२. शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>३. CAP संबंधित कागदपत्रे. (केवळ विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण शास्त्र अभ्यासक्रम )<br>४. गॅप संबंधित दस्तऐवज (गॅप असल्यास)<br>५. दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र. |

<table>
<tr><td>8</td><td>दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप</td><td>

अ) शिक्षण शुल्क :-

<table>
<tr><th rowspan="2">उत्पन्न मर्यादा</th><th colspan="4">अभ्यासक्रम</th></tr>
<tr><td>शासकीय</td><td>अशासकीय अनुदानित</td><td>टप्पा अनुदानित विना अनुदानित)</td><td>कायम विना अनुदानित</td></tr>
<tr><th colspan="5">व्यावसायिक अभ्यासक्रम</th></tr>
<tr><td>रु.2.50 लाखापर्यंत</td><td>100 %</td><td>100 %</td><td>50 %</td><td>50 %</td></tr>
<tr><td>रु.2.50 लाख ते रु. 8 लाखापर्यंत</td><td>50 %</td><td>50 %</td><td>50 %</td><td>50 %</td></tr>
<tr><th colspan="5">बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम</th></tr>
<tr><td>रु. 8 लाखापर्यंत</td><td>100 %</td><td>100 %</td><td>100 %</td><td>100 %</td></tr>
</table>

ब) परीक्षा शुल्क :-

<table>
<tr><td>व्यावसायिक अभ्यासक्रम</td><td>परीक्षा शुल्काच्या 50 %</td></tr>
<tr><td>बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम</td><td>परीक्षा शुल्काच्या 100 %</td></tr>
</table>

</td></tr>
<tr><td>9</td><td>अर्ज करण्याची पध्दत</td><td>नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>10</td><td>ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ</td><td>www.mahadbtmahait.gov.in</td></tr>
</table>